www.epunyanagari.com

Toll Free 9773927928

# पुण्य नगरी

सातारा ◆ शनिवार, ३० जानेवारी २०२१ । वर्ष : १७ । अंक : २९८ । पाने १०+४ =१४ ★ किंमत : ₹ ५.००

# भारत- चीन सीमा संघर्षावर प्रात्यक्षिके

## शिवाजी कॉलेजमध्ये प्रजासत्ताक दिन; शहिदांना मानवंदना



**सातारा** : येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये प्रजासत्ताकदिनी प्राचार्य विठ्ठल शिवणकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.प्रारंभी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन घेतले. ध्वजा रोहणानंतर डॉ. शिवणकर यांनी संदेशपर भाषण केले.

डॉ. शिवणकर म्हणाले, ''संविधानाच्या संदर्भात पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही रक्षणासाठी भाषण करून महत्वाचे संदेश दिले आहेत. आर्थिक आणि सामाजिक समतेचे स्वप्न पूर्ण करण्याचे ध्येय आपणास दिलेले आहे. सामाजिक समता आणि धार्मिक सहिष्णुता जोपासण्याची आज गरज आहे.'' बटालियन ऑफिसर सौरभ ढाणे यांच्या नेतृत्वाखाली रायफल गार्डच्या तुकडीचे नेतृत्व केले. सिनिअर अंडर ऑफिसर नेहा कणसे, काजोल पवार यांच्या नेतृत्वाखाली छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. ज्युनिअर अंडर ऑफिसर यश मोरे, सार्जंट प्राजक्ता शिंदे, संदीप मोहिते, गौरव घाडगे, ख़ुशी जांगीड यांच्या नेतृत्वाखाली रायफल ड्रिल डेमोसादर करून उत्कृष्ट सैनिकी शिस्तीचे प्रदर्शन घडविले. छत्रपती शिवाजी मिलिटरी अकादमीच्या विद्यार्थ्यांनी गलवान व्हॅलीमध्ये घडलेला भारत चीन संघर्ष सादर करून भारतीय सैनिकांनी चिनी सैनिकांच्या घुसखोरीला करारा जबाब कसा दिला याचे रोमहर्षक प्रदर्शन घडविले. या हातघाईच्या लढाईचे नेतृत्व विजय मोरे व शुभम माने यांनी केले.

कॅडेट रोहित कांबळे, प्रज्ज्वल निकम, ओंकार लोहार, तेजल जानकर यांच्या नेतृत्वाखाली मराठमोळा मर्दानी खेळ, लाठी काठी, दांडपट्टा यांचे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. श्रुती वेळापुरे व गायत्री भिलारे यांनी देशभक्ती गीतावर नृत्य केले. प्रात्यक्षिक मार्गदर्शक आयुष बर्गे, मयुरी जाधव, अकादमी प्रशिक्षक विक्रमसिंह घाडगे, लेफ्टनंट केशव पवार यांनी विशेष मेहनत घेतली. प्राध्यापक, शिक्षकांनी देशभक्तीपर व चित्रपटातील गीते सादर केली.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.